पिपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११०१८. लेखा विभाग

क्रमांक:- लेखा/पेन्शन/३२/कावि/ ४६६२ /२०

दिनांक:- ०९/०८/२०२०

विषय:- **पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निवृत्ती वेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारकाना सातवा वेतन आयोगाचे अनुषंगाने सुधारीत वेतनश्रेणी व भत्ते लागू करणे बाबत..**

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचा-यांना/निवृत्ती वेतनधारकांना/कुटुंब निवृत्ती वेतन धारकाना आदेश क्र.लेखा/३/कावि/१३३/२०२० दि.१८/५/२०२० अन्वये दि. १/१/२०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करणेत आला आहे. सदर आदेशानुसार निवृत्ती वेतनधारक/कुटुंब निवृत्ती वेतनधारकांचे निवृत्ती वेतन, सेवा उपदान व अनुंषगिक लाभ मंजूर करणेस व सुधारित निवृत्ती वेतन माहे जुन २०२० पासून अदा करणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार निवृत्ती वेतन धारक कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना सुधारित दराने निवृत्ती अदा करणे आवश्यक आहे.

तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागप्रमुखांना सुचित करणेत येते की, दिनांक १/१/२०१६ रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना/सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन मंजूर झाले आहे. अशा सर्व कर्मचा-यांची सेवानोंद पुस्तके लेखा विभागातून दिनांक २०/ ८ /२०२० पर्यंत प्राप्त करुन घ्यावीत. तसेच सदर कर्मचा-यांची सातवा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणीत वेतननिश्चीती सक्षम प्राधिका-याचे स्वाक्षरीने तीन प्रतीत मंजूर करुन. मंजूर आदेशाची सेवानोंद पुस्तकात नोंद घेऊन एक प्रत सेवानोंद पुस्तकाला डकवून एक प्रत निवृत्तीवेतन मंजूरीकामी लेखा विभागात सादर करावी.

तसेच ज्या सेवानिवृत्त कर्मचा-यांची सेवानिवृत्तीच्या अंतिम टप्प्यात वेतननिश्चीती मध्ये दुरुस्ती केली आहे. परंतु त्याची नोंद वेतनासाठी प्रशासन विभागात/संगणक कक्षात केली नाही. अशा प्रकरणी प्रथमत: त्यांच्या नोंदी प्रशासन विभागात/संगणक कक्षात करुन नंतरच त्यांचा सातवा वेतन आयोगाचा फरक काढावा. ज्या सेवानिवृत्त कर्मचा-यांकडून म.न.पा.चे काही येणे/वसूली बाकी आहे. (उद. ऑडीट आक्षेप, वैदयकीय अग्रिम समायोजन, इ.) त्याची

वसूली त्यांना देय असणा-या वेतन आयोग फरक रक्कमेतून वसूल करुन उर्वरीत फरक रक्कम अदा करणेसाठी प्रस्तावीत करावे.

सेवानिवृत्ती होणारे अधिकारी/कर्मचा-यांची निवृत्तीवेतन मंजूरी कामी सातवा वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणीत वेतननिश्चीती करुनच प्रकरण लेखाविभागाकडे तात्काळ व अचूकरित्या पाठविण्यात यावीत. जेणे करुन सेवानिवृत्त वेतनधारकांना वेळेत सुधारित सेवानिवृत्त वेतन प्राप्त होईल.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.

प्रतः- सर्व शाखाप्रमुख